# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 178/2022 दिनांक : 01.05.2022

# 1)खुनः–

**1)वजिराबाद :–**दिनांक 30.04.2022 रोजी 20.00 वा. चे सुमारास, **टी.व्ही.एस. शोरुम मिलरोड, नांदेड येथे,** यातील **फिर्यादी व त्यांचा मुलगा मयत नामे प्रेमानंद भगवान जोंधळे, वय 42 वर्षे, रा. भारतनगर सोमेश कॉलनी, नांदेड**, यांचे शेजारी राहणारे यातील नमुद दोन आरोपी यांना तुम्ही घरासमोर नेहमी चड्डीवर का फिरता व मोठमोठयाने गाणे का वाजविता असे टोकले असता त्याचा राग मनात धरुन आरोपीतांनी चाकु व खंजीरने मारुन खुन केला. वगैरे **फिर्यादी भगवान गणपतराव जोंधळे, वय 65 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. सोमेश कॉलनी,भारतनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 141/2022 कलम 302,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री जमदाडे, मो.नं. 9823322701** हे करीत आहेत.

**2)इतवारा :–**दिनांक 29.04.2022 रोजी 10.30 वा. ते 23.00 वा. चे दरम्यान, **शिवनगर पशुवैद्यकीय दवाखाना इतवारा, नांदेड येथे,** यातील **मयत नामे अमोल प्रभु साबणे, वय 23 वर्षे, रा. शिवनगर इतवारा, नांदेड**, यांस अज्ञात आरोपीने अज्ञात कारणासाठी गालावर,छातीवर,डावे दंडाचे आतील बाजुस व पोटावर धारधार शस्त्राने मारुन खुन केला. वगैरे **फिर्यादी शाम प्रभु साबणे, वय 20 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. शिवनगर,इतवारा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 93/2022 कलम 302 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री असद, मो.नं. 9405000786** हे करीत आहेत.

# 2)खुनाचा प्रयत्न :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 30.04.2022 रोजी चे 10.45 वा. ते 11.00 वा. चे दरम्यान, **जवाहरनगर तुप्पा, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा भाऊ याने यातील नमुद दोन आरोपीतांची मो.सा. थांबवुन लहान लेकर घरासमोर खेळत आहेत थोडे सावकास जा असे म्हणाल्याने आरोपीतांनी फिर्यादीचे भावास अश्लिल शिवीगाळ करीत असताना फिर्यादी घराबाहेर येवून समजावून सांगत असतांना त्यास पण अश्लिल शिवीगाळ केली व फिर्यादीचे भावास थापड बुक्याने मारहाण केली व फिर्यादीचे गळयावर तलवारीचा वार केला तो फिर्यादीने चुकवला असता आरोपीने तलवारीने डाव्या मांडीवर मारुन गंभीर जखमी करुन खुन करण्याचा प्रयत्न केला व लोकांमध्ये भिती पसरवण्याचे उद्देशाने त्याचे जवळील पिस्टलने हवेत दोन फायर करुन जमलेल्या लोकांमध्ये दहशत निर्माण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सतिश चंद्रकांत कसबे, वय 29 वर्षे, व्यवसाय वाहन चालक रा. जवाहरनगर तुप्पा, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 256/2022 कलम 307,294,323,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री थोरात, मो. नं. 9823298315** हे करीत आहेत.

# 3)जबरी चोरी :–

**1)विमानतळ :–** दिनांक 30.04.2022 रोजी पहाटे 05.40 वा. चे सुमारास, **रेल्वे डिव्हीजन गेट नं. 2 समोर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हि मार्निंग वॉक साठी गेली असता तीचे पाठीमागून मोटार सायकलवर तीन अनोळखी इसमांनी येवून फिर्यादीचे गळयातील सोन्याचे गंठन त्यामध्ये मनी मंगळसुत्र असलेले एकुण किमती 81,000/–रूपयाचा ऐवज जबरीने गळयातुन हिसकावुन चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सौ. पुष्पा कुमारी जितेंद्र कुमार सिंह, वय 32 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. चैतन्यनगर गोविंद कॉलनी, नवनाथ देशमुख यांचे घरी किरायाने, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 162/2022 कलम 392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री जाधव**, **मो. क्रं. 8007580146** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–** दिनांक 30.04.2022 रोजी पहाटे 06.50 वा. ते 07.20 वा. चे दरम्यान, **यशवंत कॉलेज समोरील रोडवर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस चाकुचा धाक दाखवुन त्याचा कडील मोबाईल हिसकावुन घेवुन मोबाईल मधील फोन पे वरुन आरोपीचे मोबाईल मध्ये 15000/–रुपये जबरीने ट्राजेंक्शन करुन जबरी चोरी केली. वगैरे **फिर्यादी महेश सुधारक वानखेडे, वय 18 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. आनंदनगर राजमॉलचे मागे, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 165/2022 कलम 392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री सोनकांबळे, मो.क्रं. 9588685155** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**1)मुक्रमाबाद :–**दिनांक 26.04.2022 रोजी 05.00 वा. ते 05.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरात खतगाव प.मु. ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीचे घरात घुसून दरवाज्याची व घरातील संसार उपयुक्त सामानाची नासधूस केली व लोखंडी सबल, काठी, बतई सारखे लोखंडी चाकुने व दगडाने फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा यास डोक्यात,हातावर,पायावर,पाठीवर मारुन साधी व गंभीर दुखापत केली व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी मारोती गुंडप्पा करगळे, वय 62 वर्षे, व्यवसाय शेती रा. खतगाव प.मु. ता. मुखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रमाबाद** गुरन 108/2022 कलम 326,324,323,452,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/1996 आडेकर, मो. नं. 8999881900** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 30.04.2022 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **मालपाणी सेंन्टेक्स टाकी बनवण्याचे कारखान्या समोर ता.जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीने पैसे न दिल्याचा राग मनात धरुन हातातील चाकुने फिर्यादीचे पोटावर तसेच कमरेस डाव्या बाजुस मारुन गंभीर दुखापत केली व शिवीगाळ करुन थापड बुक्याने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी एजाज कुरेशी राजमहमंद कुरेशी, वय 27 वर्षे, व्यवसाय खाटीक रा. बळीरामपुर ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 257/2022 कलम 326,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री बुक्तरे, मो. नं. 9421839066** हे करीत आहेत.

**3)कुंटूर :–**दिनांक 24.04.2022 रोजी 19.00 वा. चे सुमारास, **मौजे सातेगाव आरोपीच्या घरासमोर ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाई पाणी आणण्यासाठी हौदाला आरोपीचे घरासमोरुन जात असताना यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन मागील झालेल्या भांडणाचा वाद काढुन फिर्यादीचे उजव्या हाताचे कोपरा जवळ लोखंडी पाईपने मारुन फ्रॅक्चर केले व कमरेत,डोक्यास मुक्का मार दिला व साक्षीदाराला पण मुक्का मार दिला व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सखुबाई अशोक जाधव, वय 50 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. सातेगाव ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरन 75/2022 कलम 325,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/1181 कुमरे, मो. नं. 8208788324** हे करीत आहेत.

## 5)मो. सा. चोरी :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 14.04.2022 रोजी 23.00 वा. ते दिनांक 15.04.2022 रोजी 05.00 वा. चे दरम्यान, **शाहु महाराज पुतळयाजवळ, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा शाईन कंपनीची काळया रंगाची मो. सा. क्रं. एमएच–26/एबी–7707 किमती 20,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी राहुल हरी एडके, वय 42 वर्षे व्यवसाय केबल चालविणे रा. समतानगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 153/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2294 हुंडे, मो.क्र. 7083182294** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–** दिनांक 24.04.2022 रोजी 22.00 वा. ते 23.30 वा. चे दरम्यान, **कलामंदीर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो. कंपनीची काळया रंगाची मो. सा. क्रं. एमएच–26/एयु–9098 किमती 20,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी भारत प्रभाकर गादेवार, वय 26 वर्षे व्यवसाय खाजगी नौकरी रा. बाबानगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 138/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1007 झांबरे, मो.क्र. 8975992449** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**बिलोली :–** सन 2012 ते आज पावेतो, **फिर्यादीचे राहते घरी मौजे सगरोळी ता. बिलोली जि.नांदेड व मेदक (तेलंगणा) येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादी बाईस नेहमी दारु पिण्यास पैसे दे या कारणावरुन दारु पिऊन मारहाण व शिवीगाळ करुन शारिरीक व माणसीक छळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 32 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 99/2022 कलम 498(अ),323,504,506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2049 आंबेवार**, **मो. क्र. 9423615487** हे करीत आहेत.

## 7)जुगार :—

**1)वजिराबाद :—** दिनांक 30.04.2022 रोजी 11.00 वा. ते 15.00 वा. चे दरम्यान, **खडकपुरा, नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1390/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/152 मनोज बापुसिंह परदेशी, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 140/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1007 वाजीद मो.क्र. 8975992449** हे करीत आहेत.

**2)बिलोली :—** दिनांक 30.04.2022 रोजी 14.00 वा. चे सुमारास, **बिलोली ते बोधन जाणारे रोडच्या बाजुला बैलबाजारात बिलोली ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1245/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/2351 मारोती सायलु मुदेमवार, ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 100/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2542 सोनकांबळे मो.क्र. 9822172300** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड**